वसुंधरा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दि. दिनांक ०१/१२/२०२५ रोजी संस्थेच्या आवारात, इमारत पुनर्विकासाबाबत प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांचे सादरीकरण व सभासदांनी पुनर्विकासाबाबत दिलेल्या सूचनानुसार इमारत पुनर्विकासासाठी बांधकाम व्यावसायिक व विकासकाकडून स्वारस्य भागविण्यासाठी निविदा मसुदा मांडण्याबाबत विशेष सर्वसाधारण सभा ही आयोजित करण्यात आली होती.

विषय क्र. १ ठराव –

प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांचे इमारत पुनर्विकास संदर्भात फिजीबिलिटी सादरीकरण करण्याबाबत.

प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (PMC) यांचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. अमित गाडे यांनी इमारत पुनर्विकास संदर्भात फिजीबिलिटी सादरीकरण सर्व उपस्थित सभासदांसमोर केले. ~~सभासदांना~~ सादरीकरणामध्ये त्यांनी एकूण १०१ स्के. फू. रेरा कार्पेट एरिया मिळेल असे सांगितले. तसेच FSI - 3 अंतर्गत अतिरिक्त Premium खरेदी करून शासनाच्या नियमाप्रमाणे ~~मिळेल~~ एकूण ४.८ FSI मिळेल असे सांगितले. तसेच इमारतीची उंची ९५ मीटर पर्यंत मिळेल असे आश्वासित केले. तसेच प्रोजेक्ट खर्च हा अंदाजे ३०० करोड पर्यंत जाईल असे सांगितले. त्याप्रकारे त्यांनी सादरीकरण करून व उपस्थित सभासदांचे समाधान केले व सदरचा फिजीबिलीटी रिपोर्ट सोसायटी कार्यालयातील नोटिस बोर्डवरती लावण्याचे ठरले.

तसेच सभासदांच्या आलेल्या सूचनेनुसार इमारत पुनर्विकासासाठी बांधकाम व्यावसायिक व विकासक यांच्याकडून स्वारस्य भागविण्यासाठीच्या निविदा मसुदा सर्व सभासदांना समजावून सांगण्यात आले. त्यानुसार सदरचा निविदा मसुदा मंजूर करण्यात आला व कार्यालयाच्या नोटिस बोर्डवरती लावण्याचे ठरले.

अध्यक्ष श्री. दिपक बोले उपस्थित सर्व सभासदांना संबोधित करताना इमारत पुनर्विकासाठी ~~व्यवसायिक~~ बांधकाम व्यावसायिक व विकासक यांच्याकडून स्वारस्य भागविण्यासाठी नवी मुंबई व मुंबई

मराठी व इंग्रजी या दोन दैनिक पेपरमध्ये जाहिरात देणार असल्याचे सांगितले तसेच सोसायटीच्या आवारात बॅनर लावून जाहिरात करण्याचे सांगितले.

सुचक :- रिचर्ड पिंटो
अनुमोदक :- रविंद्र कांबळे

विषय क्र. २ सभासदांच्या आलेल्या सुचनांनुसार इमारत पुनर्विकास स्वास्थ्य बांधकाम व्यावसायिक व विकासक यांच्याकडून निविदा मागविण्यासाठी अंतिम (टेंडर) निविदा मसुदा मंजूर करणेबाबत.

ठराव अध्यक्ष श्री दिपक बोले यांनी सभासदांच्या आलेल्या सुचनांनुसार इमारत पुनर्विकासासाठी बांधकाम व्यावसायिक व विकासक यांच्याकडून स्वास्थ्य मागविणेसाठिचा निविदा मसुदा सभासदांच्यापुढे वाचन करुन समजावुन सांगितला. त्यास उपस्थित सर्वांनी तो मंजूर करुन सदरच्या निविदा मसुदा मंजूर केला व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवरती लावून त्यावरास मंजूरी दिली.

सुचक :- रमेश दळवी
अनुमोदक :- निलेश पाटील

विषय क्र. ३ इमारत पुनर्विकासासाठी बांधकाम व्यावसायिक व विकासक यांच्याकडून स्वास्थ्य मागविण्यासाठी मराठी व इंग्रजी पेपरमध्ये जाहिरात देणेबाबत.

ठराव अध्यक्ष श्री दिपक बोले यांनी सांगितले कि. इमारत पुनर्विकासासाठी बांधकाम व्यावसायिक व विकासक यांचेकडून स्वास्थ्य मागविणेसाठी मुंबई व जवी मुंबई परिसरातील मराठी व इंग्रजी दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊ तसेच आपल्या सोसायटी आवारात जाहिरात फलक लावू असा ठराव मांडला असता उपस्थित सर्व सभासदांनी सदर ठरावास एकमताने मंजूरी दिली.

सुचक :- अवधूत जंगम
अनुमोदक :- विजय लोटेकर

विषय क्र. ४ अध्यक्ष यांच्या परवानगीने येणारे विषय

ठराव अध्यक्ष यांच्या परवागनीने कोणतेही विषय चर्चेस न आलेने अध्यक्ष श्री दिपक बोले यांनी सभेस उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानून सभा संपुष्टात आल्याचे जाहिर केले.